घडी पत्रिका क्र. : डॉ. पंदेकृवि/प्रका/१६२३/२०२५

तणनियंत्रण :

आंब्याची बाग रोगकिडीविरहीत राहण्यासाठी स्वच्छ ठेवणे आवश्यक असते. सुरवातीच्या काळात झाडे लहान असतांना आंतरपिक घेतल्यास बागेची मशागत आपोआप होते. पुढे मात्र जेव्हा आंतरपिके घेणे इष्ट नसते अथवा शक्यही नसते. तेव्हा बागेत वर्षातून २ वेळा हलकी नांगरणी करावी. जुनमध्ये आणि जरूरीनुसार ऑक्टोबरमध्ये नांगरणी करावी. झाडाभोवतीचा आळ्यातील भाग अधुनमधून खुरपून स्वच्छ ठेवावा. वाफ्यामध्ये वाळलेले पालापाचोळा घातल्यास तणही वाढत नाही आणि ओलावाही टिकून राहण्यास मदत होते.

वळण आणि छाटणी :

साधारणपणे आंब्याच्या झाडांना छाटणीची गरज नसते. परंतु सुरूवातीच्या काळात झाडाला योग्य वळण देणे आवश्यक असते. झाडाची वाढ एकाच खोडावर करून घ्यावी. त्यासाठी १ मीटर उंचीपर्यंत येणारी खोडवरील फुट वेळोवेळी काढून टाकावी. त्यानंतर झाडाचा समतोल राहील अशा बेताने ३-४ फांद्या वाढू द्यावेत. गुंतागुतीच्या, वाकड्या फांद्या तसेच किडलेल्या फांद्या छाटुन काढाव्यात. खुंटावरून येणारी फुट वेळोवेळी काढावी. पहिली चार वर्षेपर्यंत कलमांना मोहोर आल्यास तो खुडावा.

मोहर येण्याची वेळ : जानेवारी-फेब्रवारी

काढणी :

फळे एप्रिल ते जुन महिन्यामध्ये परीपक्व होऊन काढणीस तयार होतात. फळे काढतांना किंवा काढणीनंतर फळांची हाताळणी करतांना फळांना इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. अन्यथा फळांचा पृष्ठभाग घासला जाऊन फळे खराब होतात. एक एक फळ खुडीने तोडुन ते झेल्यामध्ये अलगदपणे झेलणे योग्य ठरते. फळे तोडतांना देठाचा काही भाग फळासोबत ठेवावा. फळे काढणीनंतर उन्हामध्ये न ठेवता सावलीत ठेवावीत. विक्री करण्याच्या दृष्टीने प्रतवारी करणे आवश्यक आहे. फळांची आकारानुसार प्रतवारी केली जाते. सडकी, मार लागलेली फळे काढुन टाकावीत आणि आकारानुसार प्रतवारी करावी.

उत्पादन :

कलमी आंब्याची सर्वसाधारणपणे ५ व्या वर्षापासून चांगली फळे मिळतात. १० वर्षापर्यंत उत्पादन हळुहळु वाढते. नंतर झाडे वाढल्यानंतर उत्पन्नही वाढते. झाडे ३०-५० वर्षापर्यंत फळे देतात. सुरूवातीची काही वर्षे फळे दरवर्षी मिळतात. पुढे पुढे एक वर्षाआड फळे मिळतात. जातिपरत्वे ह्यात फरक आढळून येतो. सर्वसाधारणपणे ५ ते ८ वर्षाच्या झाडांपासून २०० ते ३०० फळे, ९ वर्षे व त्यापुढे ३०० ते ५०० फळे प्रति झाड एवढे उत्पन्न मिळू शकते.



आंबा लागवड व्यवस्थापण



डॉ. किशोर कि. झाडे
वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख

श्री. सुचित के. लाकडे
विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या)

श्री. पुष्पक ए. बोथीकर
विषय विशेषज्ञ (पिक संरक्षण)

श्रीमती निलीमा पाटील
विषय विशेषज्ञ (गृहविज्ञान)

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

कृषि विज्ञान केंद्र

सोनापूर-गडचिरोली

दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३०१७

Email - kvksonapur@gmail.com

Website - www.kvkgadchiroli.in

आर्थिक आणि अन्नद्रव्य मुल्यांच्या दृटीने आंबा हे सर्वाच्या आवडीचे फळ असून त्याच्या विविध उपयोगांमुळे आणि गुणधर्मांमुळे हया पिकास महत्व प्राप्त झाले आहे. विविध प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करण्याच्या दृटीने आंबा हे फळ सर्वोत्तम मानले जाते. आंब्याच्या फळाच्या वाढीच्या कोणत्याही अवस्थेत-गोटीएवढया आकाराच्या फळापासून ते पूर्ण पोसलेल्या पक्व अवस्थेपर्यंतच्या फळापासून विविध खाद्यपदार्थ तयार करता येतात. कैऱ्या, चटणी, कढी, पन्हे, मुरंबा, लोणची हयांसाठी तसेच पूर्ण पिकलेले फळ खाण्यासाठी, फळाच्या फोडीव रस हवाबंद डब्यात भरण्यासाठी, जॅम, सरबत, टॉफी, आमरस, पोळी, आंबावडी इत्यादी पदार्थ तयार करण्यासाठी वापरतात. कोयीच्या आतल्या दलावर रासायनिक प्रक्रिया करून अन्नपदार्थाची निर्मिती करता येते. तसेच कापडास खळ देण्यासाठी स्टार्च तयार करता येतो. आंब्यांच्या लाकडाचा खोकी, दरवाजे, फळया इत्यादी वस्तु तयार करण्यासाठी तसेच सरपणासाठी उपयोग करतात.

हवामान :

आंबा हे उण हवामानातील पीक आहे. महाराट्रातील सर्व जिल्ह्यात आंबा लागवडीस हवामान योग्य आहे. हमखास आणि भरपूर पाऊस होत असलेल्या प्रदेशात जून ते ऑक्टोबर हया कालावधीत जमिनीत खोलवर पावसाचे पाणी मुरवून आंबा पीक चागल्या प्रकारे वाढविता येते आणि त्यापासून चांगले उत्पादन मिळू शकते. बहार येण्यापूर्वी कोरडे हवामान असल्यास बहारावर त्याचा चांगला परीणाम होतो. आंबा पिकाच्या उत्तम वाढीसाठी १७.७ ते २६.६ अंश सेल्सिअस तापमान असावे लागते.

जमिन :

झाडांची वाढ चांगली होण्यासाठी योग्य जमिनीची निवड करणे ही आंबा उत्पादनातील महत्वाची बाब आहे. आंब्याचे झाड अनेक प्रकारच्या जमिनीत चांगले वाढते. कोकणातील जांभा दगडापासून बनलेल्या खोल जमिनी, तसेच राज्याच्या इतर भागातील गाळवट खोल ते मध्यम खोल आणि चांगला निचरा होणाऱ्या आम्लयुक्त जमिनी ह्या पिकाच्या लागवडीस उत्तम समजल्या जातात.आदर्श आंबा लागवडीसाठी जमिनीचा आम्लविम्ल निर्देशांक ६.५ ते ७.५ असावा.

उन्नत जाती :

केशर, दशहरी, आम्रपाली, पायरी, लंगडा, राजापुरी, तोतापुरी, निलम, रत्ना, सिंधु, मल्लिका, निरंजन.

अभिवृद्धी : कोय कलम किंवा मृदकाठ कलम करून

लागवडीचा हंगाम : जुन ते सप्टेंबर

लागवडीचे अंतर : १० x १० मी. घन लागवडीकरीता ५ x ५ मी.

लागवड :

एप्रिल-मे महिन्यामध्ये १ x १ x १ आकाराचे खड्डे खोदुन तयार करून घ्यावे. वरच्या थरातील चांगली माती किंवा नदीच्या गाळाची माती आणि उत्तम कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत, दोन ते तीन किलो सुफर फॉस्फेट यांचे मिश्रण करून तो खड्डा भरण्यास वापरावे. खड्डे मे महिन्याच्या तिसऱ्या आठवडामध्ये भरावे.

खत व्यवस्थापन :

झाडाचे वय (वर्ष)	शेणखत/कंपोस्ट (किलो)	खताची मात्रा/झाड		
		नत्र (ग्रॅम)	स्फुरद (ग्रॅम)	पालाश (ग्रॅम)
१	१	१२०	१५०	०५०
२	२	२४०	३००	१००
३	३	३६०	४५०	१५०
४	४	४८०	६००	२००
५	५	६००	७५०	२५०
६	६	७२०	९००	३००
७	७	८४०	१०५०	३५०
८	८	९६०	१२००	४००
९	९	१०८०	१३५०	४५०
१० वों व त्यापुढे	१०	१२००	१५००	५००

वरीलपैकी संपूर्ण शेणखत व गासायनिक खताचा अर्धा हप्ता पाऊस पडताच तर उरलेला अर्धा हप्ता सप्टेंबर-ऑक्टोबर मध्य द्यावा. शेणखत उपलब्ध नसल्यास प्रमाण ठरवून कंपोस्ट, लेंडीखत किंवा ढेप देता येईल.

पाणी व्यवस्थापन :

आंबा हे पावसाच्या पाण्यावर वाढणारे कोरडवाहु फळझाड आहे. असे असेल तरी रोपांची/कलमांची पहिली ३-४ वर्षे जलद वाढ होण्यासाठी पाणी देणे आवश्यक ठरते. जमिनीचा प्रकार आणि त्या त्या भागातील पावसाचे प्रमाण यानुसार पाण्याच्या पाळयांची संख्या ठरविता येते. कलमे लावून केलेल्या झाडांची मुळे खोलवर जात नाहीत. अशा बागांना पाण्याच्या पाळया जास्त लागतात. कलमे लावल्यावर येणाऱ्या पहिल्या हिवाळ्यात आठवड्यातुन एक वेळ आणि उन्हाळ्यात दर आठवड्यात दोन वेळा पाणी द्यावे. दुसऱ्या हिवाळ्यात १५ दिवसांतून एक वेळ आणि उन्हाळ्यात दर आठवड्यात एक वेळ पाणी द्यावे. तिसऱ्या हिवाळ्यात महिन्यातून एक वेळ आणि उन्हाळ्यात एका महिन्यात दोन वेळा पाणी द्यावे. पाणी देण्यासाठी कलामांच्या बुंध्याभोवती गोलाकार आळे करावे आणि प्रत्येक वेळी दोन बादल्या म्हणजे सुमारे २० ते २५ लीटर पाणी द्यावे. पावसाळ्यात पावसाची शक्यता असल्यास गरजेप्रमाणे पाणी द्यावे. ठिंबक सिंचनाचा अवलंब केल्यास पाण्याची बचत होते.

आंतरपिके :

१० x १० मी. अंतरावरील आंब्यामध्ये सुरूवातीला ४-६ वर्षापर्यंत आंतरपिके घेणे शक्य असते. जास्त खोल मुळे न जाणाऱ्या भाजीपाला पिकांची-टोमॅटो, वांगी, कोबी, वाल, मुळा, पालक, इत्यादी पिकांची आंतरपिके म्हणून लागवड करावी. द्विदल धान्यांमधील वाटाणा, उडीद, मुग, इत्यादींची लागवड फायदेशीर ठरते. जसजसे आंब्याचे झाड वाढत जाईल तसतसे आंतर पिकाचे क्षेत्रफळ कमी करावे. आंतर पिकाला खताची जास्तीची मात्रा द्यावी. पपईचे पीकही आंतरपीक म्हणून घेता येते.